Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 10TH MARCH 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख ९ वी फेब्रुवारी, सन १८९८.

नंबर ९२६ —खालीं दिलेला जाहिरनाम्याचा मसुदा सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे. ज्या मनुष्यांस त्याच्या संबंधानें हरकती घ्यावयाच्या असतील त्यांना असें प्रसिद्ध करण्यांत येत आहे कीं त्यांनीं त्या हरकती हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत चीफ् सेक्रेटरी निसबत सरकार, रेव्हिन्यू डिपार्टमेंट, यांजकडे लिहून पाठवाव्या:—

### जाहिरनाम्याचा मसुदा.

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, सन १८८६ च्या पिट्रोलियम आक्टाच्या ८ व्या व ११ व्या कलमांअन्वयें करण्यांत आलेल्या ज्या कानू, मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, पृष्ठ ६१३–६१८ यांवर जाहिरनामा नंबर ५०१८, तारीख ११ जुलै, सन १८९३ यांत, प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत त्या कानूंमध्यें खालीं दिलेल्या सुधारणा केल्या आहेत:

१. ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू ६.(६)(अ), याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा.

"भयकारक नाहीं असें पिट्रोलियम रेलवेनें, रस्त्यानें अगर जलमार्गानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्या-बदलचे बारा महिन्यांच्या मुदतीचे साधारण परवाने देण्याचा अख्त्यार आहे. अशा परवान्यांमध्यें, त्यांच्या धारण करणारांना खरोखर त्यांचें हातचें पिट्रोलियम, न्यावयाच्या स्थळासंबंधानें अगर परि-माणासंबंधानें निबंध ठेविल्याशिवाय, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा अधिकार दिला पाहिजे."

२. त्याच कानूंस जोडलेल्या फ नमुन्यांत,

(१) सदरहू नमुन्याच्या मथळ्याच्या मजकुरांत आणि त्याच्या पहिल्या पारिग्राफाच्या पहिल्या व दुसऱ्या ओळींत ' गाडीनें (अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असेल तसें)" हे शब्द आहेत त्या प्रत्येक जागीं त्यांच्या ऐवजीं "मोठ्या प्रमाणानें (अगर मोठ्या प्रमाणाखेरीज इतर रीतीनें, जसें असेल तसें,)" हे शब्द दाखल करावे;

(२) सदरहू नमुन्याच्या मथळ्याखालील "कानू ६ (अ) पाहा" या शब्दांच्या ऐवजीं "कानू ६, (६) (अ) पहा" हे शब्द दाखल करावे.

३. त्याच कानूंस जोडलेल्या ग नमुन्याच्या मथाळ्याच्या मजकुरांत, "गाडीनें ( अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असें असेल तसें, ) " या शब्दांच्या बदला "मोठ्या प्रमाणानें ( अगर मोठ्या प्रमाणाखेरीज इतर रीतीनें, जसें असेल तसें, )" हे शब्द दाखल करावे.

आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मॉण्टीथ,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.